N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): नंदुरबार **P.S.** (ठाणे): विसरवाडी

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0323 **Year** (वर्ष): 2026

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 27/07/2026 22:16

2.

S.No. (अ.क्र.)	**Acts** (अधिनियम)	**Sections** (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day** (दिवस): सोमवार **Date From** (दिनांक पासून): 27/07/2026
Time Period (कालावधी): **Date To** (दिनांक पर्यंत): 27/07/2026
Time From (वेळेपासून): 12:25 वाजे
Time To (वेळेपर्यंत): 21:00 वाजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक): 27/07/2026 **Time** (वेळ): 21:40 वाजे

(c) **General Diary Reference** (ठेशनामधा संदर्भ):

Entry No. (नोंद क्र.): 012

Date & Time (दिनांक आणि वेळ): 27/07/2026 21:40 वाजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.** (पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पूर्व, 18 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): भादवड, भादवड फाटा शासकीय आश्रमशाळेजवळ, नवापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S. (पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): [illegible]

(b) **Father's/Husband's Name** (वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.** (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पत्ता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नंदुर,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पत्ता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नंदुर,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9850906200

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पत्ता)
1	विलास मधुकर पाटील			1. 23ब, अनिल नगर, ,नंदुरबार , नंदुरबार ,नंदुरबार शहर,नंदुरबार, महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडुन तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणी आणि चलन	भारतीय- रुपया	2350 त्यात 500 रुपये दराच्या	2,350.00

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
			04 नोटा, 200, 100, 50 दराच्या प्रत्येकी एक नोट	

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

2,350.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत):**

मी, रेश्मा चंद्रकांत अवतारे, वय 35 वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नंदुरबार. मो.नं. 9850906200

सरकारतर्फे फिंयादी होवुन फिंयाद लिहुन देते की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नंदुरबार येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिंनाक 24/07/2026 रोजी तक्रारदार श्रीमती सुजाता विलास कंडारे, अधिक्षिका, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भादवड ता.नवापुर जि.नंदुरबार, यांनी पोहवा/विजय ठाकरे नेमणुक ला.प्र.वि. नंदुरबार यांना संपर्क करुन एका लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्याबाबत ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालयात येवुन कारवाई करण्याबाबत विंनती केली. त्याप्रमाणे पोलीस उप अधीक्षक श्री. प्रशांत भरते सा◌ो लाप्रवि नंदुरबार यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नंदुरबार व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांना पत्र पाठवुन त्यांचे कार्यायातील महिला पंच 1) श्रीमती निकीता रविंद्र साळुके, कनिश अभिंयता व 2) श्री. राहुल गोविंद सुर्यवंषी, कनिश्ठ लिपीक, यांना पंच म्हणुन अ◌ॅन्टी करप्षन कार्यालय, नंदुरबार येथे◌े उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर पो. उपअधीक्षक प्रषांत भरते यांनी तक्रारदार यांना दोन्ही पंचांसमक्ष त्यांचे पुर्ण नाव, गाव, पत्ता व तक्रारीबाबत विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्रीमती सुजाता विलास कंडारे, वय-30 वर्षे, व्यवसाय- नोकरी, अधिक्षिका, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भादवड ता.नवापुर जि.नंदुरबार रा. भादवड आश्रमषाळा, शासकीय निवास्थान, ता.नवापुर जि. नंदुरबार मुळ रा. प्ला◌ॅट नं. 17, ब्ला◌ॅक न. 3, ममता राणे नगर, जळगाव यांनी तक्रार दिली की,

"मी वर नमूद प्रमाणे असून शासकीय आश्रमशाळा, भादवड, ता.नवापूर, जि.नंदुरबार येथे आश्रमशाळा अधिक्षिका म्हणून दिनाक 24.07.2023 पासून कार्यरत आहे. दिनाक 16.06.2025 रोजी 06 महिंन्यासाठी प्रसुती रजा घेतली होती. मात्र रजा मंजूरी आदेश एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, नंदुरबार यांचेकडून प्राप्त नसल्याने माझे 15 दिंवसाचे वेतन थाबविण्यात आले होते. माझे थांबविण्यात आलेले जुन महिन्यातील 15 दिवस प्रसुती रजा कालावधीतील वेतनाचे पुरवणी बील आमच्या आश्रमशाळेचे मुख्याध्यापक श्री. विलास मधुकर पाटील यांनी कोषागार कार्यालय, नवापूर येथे सादर केले होते, सदर बिलाची रक्कम माहे डिसेंबर, 2025 मध्ये माझे एसबीआय बॅंक खात्यात जमा झाली होती.

त्यानंतर माझी प्रसुती रजा माहे डिसेबर,2025 मध्ये संपणार असल्याने, मी सदर रजेस जोडून दोन महिंन्यासाठी बालसंगोपन रजेचा अर्ज मुख्याध्यापक श्री.विलास पाटील यांचे कार्यालयास सादर केला होता, त्यानंतर त्यांनी माझा बालसंगोपन रजेचा प्रस्ताव एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, नंदुरबार कार्यालयाकडे पाठविला होता. सदर रजा मंजूरी आदेश संबंधित कार्यालयाकडून प्राप्त नसल्याचे सांगून माहे डिंसेबर,2025 चे अध्र्या महिन्याचे तसेच माहे जानेवारी, 2026 चे पुर्ण महिन्याचे व फेब्रुवारी,2026 चे अध्र्या महिन्याचे वेतन असे एकूण 02 महिंन्याचे वेतन काढण्यात आले नसल्याचे मला मुख्याध्यापक श्री.विलास पाटील यांनी सांगितले होते.

त्यानंतर माझे प्रलंबित असलेले डिंसेबर,2025 चे अध्र्या महिन्याचे तसेच माहे जानेवारी,2026 चे पुर्ण महिन्याचे व फेब्रुवारी,2026 चे अध्र्या महिन्याचे वेतन असे एकूण 02 महिंन्याचे वेतनाचे पुरवणी बील मुख्याध्यापक श्री. विलास मधुकर पाटील यांनी कोषागार कार्यालय, नवापूर येथे सादर केले होते, सदर बिलाची रक्कम माहे मार्च, 2026 मध्ये माझे एसबीआय बॅंक खात्यात जमा झाली आहे. त्यानंतर माझे प्रलंबित असलेले माहे

फेब्रुवारी,2026 चे अध्र्या महिन्याचे तसेच माहे मार्च,2026 ते एप्रिल,2026 चे असे एकूण अडीच महिंन्याचे वेतनाचे पुरवणी बील मुख्याध्यापक श्री.विलास मधुकर पाटील यांनी कोषागार कार्यालय, नवापूर येथे सादर केलेले असून सदर बिलाचे वेतन माझे एसबीआय बँक खात्यात जमा झाले आहे.

माझे सुटट्या संपल्यावर मी दिंनाक 15.06.2026 रोजी कर्तव्यावर हजर झाले. त्यानंतर दिंनाक 16.06.2026 रोजी मी हजेरी रजिस्टरवर स्वाक्षरी करण्यासाठी मुख्याध्यापक श्री.विलास पाटील यांचे दालनात गेले असता त्यांनी मला माझे प्रसुति रजा कालावधीतील 01 पुरवणी वेतन देयक व माहे डिसेंबर, 2025 ते एप्रिल, 2026 या कालावधीतील बालसंगोपन रजा कालावधीचे 02 पुरवणी वेतन देयक असे कोशागार कार्यालय, नवापूर येथे सादर केले असुन त्यांनी माझेकडे नमुद बिले सादर केल्याच्या मोबदल्यात लाचेची मागणी केली. त्यावेळी त्यांनी मला माझे प्रसुति रजा कालावधीतील वेतनाचे व बालसंगोपन रजा कालावधीतील वेतनाचे असे एकूण 03 देयके कोषागार कार्यालय, नवापूर येथे सादर केल्याचे मोबदल्यात प्रत्येकी 750/- रु प्रमाणे एकूण 2,250/- व मे 2026 या महिन्याचे वाढीव पगार देयके सादर केल्याने त्याचे 100/- रूपये असे एकुण 2,350/- रूपये लाचेची मागणी केलेली रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसून लाच आहे अशी माझी खात्री झाली आहे. आमचे कोणतेही आर्थिक देवाण-घेवाणीचे व्यवहार किंचस पुर्ववैमनस्य नाहीत. आज मी मुख्याध्यापक श्री.विलास पाटील यांचेकडे माझे दुर्गम भागातील कामाचा प्रोत्साहन भत्त्याचे बिलाबाबत विचारपूस करण्यासाठी जाणार आहे व सदर वेळी ते माझेकडे लाचेची मागणी करण्याची शक्यता आहे. तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी माझी तक्रार आहे.''

अशा मजकुरची तक्रार तक्रारदार श्रीमती सुजाता कंडारे यांनी स्वःहस्ताक्षर लिहून दिलेली असून तक्रारीवर तक्रारदार, दोन्ही पंच, व पोलीस उप अधीक्षक श्री. प्रषांत भरते, लाप्रवि नंदुरबार अषांनी वाचून सहया केलेल्या आहेत.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. प्रशांत भरते, लाप्रवि, नंदुरबार यांनी लाचेचा सापळा कार्यवाहीमध्ये सुरूवातीला पडताळणी करणे आवश्यक असल्याने पोलीस उप अधीक्षक श्री. प्रषांत भरते, पोहवा/विजय ठाकरे, पोना/हेमंत महाले, तक्रारदार व दोन षासकीय पंच असे आवष्यक त्या साधनसामुग्रीसह षासकीय वाहन क्र. एम.एच. 39 ए.क्यु.4873 हिचेने चालकासह ला.प्र.वि. कार्यालय नंदुरबार येथुन निघुन भादवड ते विसरवाडी गावाच्या रस्त्यावरील एका बंद असलेल्या हाॅटेलसमोर वाहन थांबविले. त्यानंतर त्याच्या सुचनेवरुन पोहवा/ विजय ठाकरे यांनी सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हाॅईस

रेकाॅ

ड

र व 16 जी.बी.चे सॅनडिस्क कंपनीचे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये टाकून त्यात फोल्डर

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. प्रशांत भरते, लाप्रवि, नंदुरबार यांच्या सुचनेवरून पंच नं. 1 श्रीमती निकीता साळुंखे यांनी डिजीटल व्हाॅईस

रेकाॅ

ड

र तक्रारदार श्रीमती सुजाता कंडारे यांचे पंजाबी ड्रेसचे आतील त्यांचे गळयातील चेनला लेसच्या सहाय्याने अडकवले. त्यानंतर

त्याप्रमाणे दि. 27/07/2026 रोजी आम्ही, सोबतचे सापळा पथकातील अंमलदार व दोन्ही शासकीय पंच असे सापळा कारवाईकामी सर्व साहित्यानिशी शासकीय व खाजगी वाहनाने स्टाफसह भादवड गावातील शासकीय आश्रमशाळेच्या परिसरातील तक्रारदार यांचे घराजवळ पोहोचलो. सदर ठिकाणी आम्ही दोन्ही पंचांची व तक्रारदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे उत्पन्नाचे बचतीतुन 2350/-रुपये, त्यात 500/- रु. दराच्या 04 चलनी नोटा, 200/- रुपये दराची 01 नोट, 100/- रुपये दराची 01 व 50/-रुपये दराची 01 नोट अश्या हजर केल्या. सदर नोटांना पोना/ हेमंतकुमार महाले यांनी पंचांसमक्ष अँन्थ्रासीन पावडर लावली व सदर नोटा आम्ही तक्रारदार यांचे पंजाबी ड्रेसचे उजव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर आम्ही सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हाॅईस

रेकाॅ

ड

र व 08 जी.बी.चे सॅनडिस्क कंपनीचे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये टाकून त्यात फोल्डर

तरी, दिंनाक 24/07/2026 रोजी आरोपी लोकसेवक श्री. विलास मधुकर पाटील, वय 49 वर्शे, व्यवसाय नोकरी माध्यमिक मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा भादवड, जिल्हा नंदुरबार रा. 23ब, अनिल नगर, नंदुरबार यांनी त्यांचे सार्वजनिक कर्तव्य अनुचितपणे, अप्रामाणिकपणे करुन स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेण्याचे हेतुने भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी अन्य

पारितोषण मिळावे म्हणून तक्रारदार श्रीमती सुजाता विलास कंडारे यांच्या प्रसुती रजेचे 01 देयक व बालसंगोपन रजेचे 02 देयक असे एकूण 03 देयकांचे प्रत्येकी 750/-रु. प्रमाणे 2250/-रुपये व माहे मे 2026 या महिन्याच्या पगाराचे वाढीव बिलाचे 100/- रुपये असे एकुण 2,350/-रुपये असे देयक वरीष्ठ कार्यालयात सादर करुन मंजुर करुन दिल्याचे मोबदल्यात बक्षीस म्हणुन लाचेची मागणी केली व मागणी केलेली लाचेची रक्कम दि.27/07/2026 रोजी 12/25 वाजेच्या सुमारास पंच क्र. 1 यांचेसमक्ष शासकीय माध्यमिक आश्रमशाळा भादवड, जिल्हा नंदुरबार येथील मुख्याध्याक दालनात तक्रारदार यांचे कडून स्विकारली, म्हणुन माझी वरील आरोपी लोकसेवक श्री. विलास मधुकर पाटील विरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम, 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Jayesh Dagdu Khalane(I (Inspector)) / DGPJDKM8801 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Jayesh Dagdu Khala
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): DGPJDKM8801

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
विसरवाडी पोलीस स्टेशन
ता.नवापूर जि.नंदुरबार

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the (If known / seen)**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

S.No.(अ.क्र.)	Sex (लिंग)	Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष)	Build (बांधा)	Height (cms.) (उंची(सें. मी.))	Complexion (रंग)	Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष					चेचक के दाग: NO

Deformities/ Peculiarities	Teeth (दात)	Hair (केस)	Eyes (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language /Dialect (भाषा / बोलीभाषा)	Place Of (का स्थान)					Others (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा)	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)